# मुंबई विद्यापीठ

निवडणूक विभाग
अत्यंत महत्वाचे

e-mail- arelection@mu.ac.in
Tel. No. - 022-2270 8710
022-2269 6147

क्र.नि.वि. इएल(बीओएस्)/४५-डी/२०१०
दिनांक २२ ऑक्टोबर, २०१०

**निवडणूक अधिसूचना-**

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ३७(२)(बी) मधील तरतूदीनुसार महाविद्यालयांमधील विभागप्रमुखांची विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर निवडून देण्यासाठीची कार्यक्रम सुची.

परिनियम ३५५(ए) आणि महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ११५(२)(xii) नुसार कुलगुरुंनी वरील मतदार संघासाठी दिनांक ८ डिसेंबर २०१० ही निवडणुकीची तारीख निश्चित केली आहे.

१) अंतिम मतदार यादी परिपत्रक क्र. क्र.नि.वि. इएल/(बीओएस्)/४५-सी/ २०१० दिनांक २२ ऑक्टोबर, २०१० अन्वये दि. २२ ऑक्टोबर, २०१० रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. अंतिम मतदार यादीप्रमाणे या निवडणुका घेण्यात येत आहेत.

२) विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या खालिल विविध अभ्यास मंडळांच्या अंतिम मतदार यादीत नावे समाविष्ट असलेल्या विभाग प्रमुखांनाच या निवडणुकीत भाग घेता येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | २० | स्टॅटीस्टीक |
| २ | पर्शियन, अरेबिक इस्लामिक कल्चर इ. | २१ | जिऑग्राफी |
| ३ | संस्कृत, पाली आणि प्राकृतस् | २२ | फिजिक्स |
| ४ | मराठी | २३ | मायक्रो बायोलॉजी |
| ५ | गुजराती | २४ | केमिस्ट्री |
| ६ | हिंदी | २५ | बायो केमिस्ट्री |
| ७ | उर्दू | २६ | बॉटनी |
| ८ | सिंधी | २७ | झुऑलॉजी |
| ९ | कन्नड | २८ | जिऑलॉजी |
| १० | हिस्ट्री आणि आरकेलॉजी | २९ | लॉ |
| ११ | रुरल डेव्हलपमेन्ट | ३० | कॉमर्स |
| १२ | इकॉनॉमिक्स | ३१ | बिझनेस इकॉनॉमिक्स |
| १३ | पॉलिटिक्स | ३२ | अकौंटन्सी |
| १४ | सोसिओलॉजी | ३३ | बिझनेस मॅनेजमेंट |
| १५ | लॉजीक अॅन्ड फिलॉसॉफी | ३४ | पेंटीग अॅड अप्लाईड आर्टस |
| १६ | सायकॉलॉजी | ३५ | सिव्हिल इंजिनिअरिंग |
| १७ | एज्यूकेशन | ३६ | मेकॅनिकल इंजिनिअरिंग |
| १८ | सोशल वर्क | ३७ | इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग |
| १९ | मॅथेमॅटिक्स | | |

३) परिनियम ३७५ ते ३७७ नुसार मतदान टपालाद्वारे होईल.

४) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ४२(१) नुसार प्रत्येक प्राधिकरणाचा कालावधी १ सप्टेंबर, २०१० पासून पाच वर्षापर्यंत असेल.

सदर निवडणुकीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.:-

| अ. क्र. | तपशील | वार, तारीख, व वेळ |
|---|---|---|
| १ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द | शुक्रवार, २२ ऑक्टोबर २०१० |
| २ | अंतिम मतदार यादी शुध्दी पत्र (आवश्यकता भासल्यास) | शुक्रवार, १९ नोव्हेंबर २०१० |
| ३ | नामनिर्देशन अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख | सोमवार, २२ नोव्हेंबर २०१० (सायं. ४-०० वाजेपर्यंत) |
| ४ | नामनिर्देशन अर्ज छाननी | मंगळवार, २३ नोव्हेंबर २०१० |
| ५ | नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याची तारीख | बुधवार, २४ नोव्हेंबर २०१० (सायं. ४-०० वाजेपर्यंत) |
| ६ | मतदान पत्रिका मतदारांना पाठविण्याची तारीख | शनिवार, २७ नोव्हेंबर २०१० |
| ७ | निवडणुकीची तारीख, वार व वेळ | बुधवार, ०८ डिसेंबर २०१० (सायं. ५-०० वाजेपर्यंत) |
| ८ | मतमोजणी तारीख, वार व वेळ, | गुरुवार, ०९ डिसेंबर २०१० (सकाळी ११-३० वाजता) |

५) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम २४ (ए) अन्वये महाराष्ट्र शासनाने कोणत्याही प्रधिकरणावर/मंडळावर निवडुन येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी दिनांक १४ सप्टेंबर, २००९ अंतर्गत विहीत केलेल्या पात्रता व शर्ती विद्यापीठाने परिपत्रक क्रमांक नि.वि.(६४)/३२/२०१०. दिनांक १७ फेब्रुवारी, २०१० अन्वये सर्व संबंधिताना पाठविल्या आहेत. सदर पात्रता व शर्ती बंधनकारक आहेत. विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेत स्थळावर सदर परिपत्रक उपलब्ध आहे.

६) मतदार याद्या खालील ठिकाणी उपलब्ध आहेत. प्रत्येक अभ्यास मंडळाच्या मतदार यादीची किंमत स्वतंत्र तक्त्यात दिली आहे.(संलग्न)

अ) सहायक कुलसचिव, निवडणूक विभाग, कक्ष क्रमांक ११०, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२;

ब) उपकुलसचिव, सामान्य प्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, तळ मजला, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी परिसर, कालीना, सांताक्रुज (पूर्व), मुंबई - ४०० ०९८

क) सहायक कुलसचिव, रत्नागिरी उपकेंन्द्र, मुंबई विद्यापीठ, पी-६१, एम.आय.डी.सी., मिरजोळे, जिल्हा - रत्नागिरी - ४१५६३९

....३/-

७) परिनियम ३६१ नुसार कुलगुरुंना मतदार यादीत दुरुस्ती करण्याचे अधिकार आहेत.परिनियम ३६१ खालीलप्रमाणे आहे:-

> "The Vice-Chancellor shall have the authority to correct the rolls, if any omission or wrong entries be brought to his notice at least 15 clear days before the date of election. The Vice-Chancellor's decision in the matter shall be final."

८) विहीत नमुन्यातील नामनिर्देशन अर्ज परिपूर्णरित्या भरणे आवश्यक आहे. अपूर्ण अर्ज फेटाळण्यात येतील.

९) विहीत नमुन्यातील नामनिर्देशन अर्जासाठी मतदाराने खालील ठिकाणी अर्ज करावा.:-

(अ) कुलसचिव-तथा-निवडणुक निर्णय अधिकारी, निवडणुक विभाग, कक्ष क्रमांक ११०, पहिला मजला, फोर्ट,मुंबई - ४०० ०३२.

(ब) सहायक कुलसचिव, रत्नागिरी उपकेंन्द्र, मुंबई विद्यापीठ, पी-६१, एम.आय.डी.सी., मिरजोळे, जिल्हा - रत्नागिरी - ४१५६३९

१०) उमेदवाराने लेखी विनंती करुन आणि संबंधिताच्या मान्यतेने अधिकृत केलेल्या प्रतिनिधीस नामनिर्देशन अर्जाच्या छाननीस उपस्थीत राहता येईल, परंतु त्या प्रतिनिधीचे नांव त्या मतदार संघाच्या यादीत असणे आवश्यक आहे.

११) मतदान करण्याची पध्दत आणि खातरजमा (attestation) याबाबतच्या सुचना मतदान पत्रिके सोबत पाठविण्यात येतील.

दिनांक- २२ ऑक्टोबर, २०१० (ल.रा.माने)
स्थळ- मुंबई स्थानापन्न कुलसचिव
तथा निवडणूक निर्णय अधिकारी